# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः18.06.2025** **वारःबुधवार**

1. ऊर्जा सुरक्षितता, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि गुंतवणुकीच्या भविष्यावर जी-7 देशांसोबत पंतप्रधानांची चर्चा
2. कृषि क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी
3. राज्यात आतापर्यंत सुमारे साडे अकरा लाख हेक्टरवर पेरण्या आणि
4. आषाढी वारीसाठी संत श्री तुकाराम महाराज पालखी सोहळा आज पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार

**पंतप्रधान-कॅनडा**

कॅनडामधील कनानास्किस इथं झालेल्या जी-7 संपर्क शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जी-7 नेत्यांसोबत प्रमुख जागतिक आव्हानं आणि सामायिक आकांक्षांवर फलदायक चर्चा केली. बदलत्या जगातील सहभाग आणि परवडेल अशी क्षमता यांची खात्री करण्यासाठी ऊर्जा सुरक्षितता, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि गुंतवणूकीच्या भविष्यावरील जी-7 चर्चेत त्यांनी भाग घेतला. आपल्या भाषणात, पंतप्रधानांनी शाश्वत आणि हरित मार्गानं सर्वांसाठी ऊर्जा सुरक्षिततेची खात्री करण्याची गरज अधोरेखित केली आणि या उद्देशासाठी आंतरराष्ट्रीय सौर आघाडी, आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधा परिषद आणि जागतिक जैवइंधन आघाडी यासारख्या भारताच्या जागतिक उपक्रमांवर सविस्तर चर्चा केली. विकसनशील देशांच्या चिंता आणि प्राधान्यांकडे लक्ष वेधून त्यांनी नमूद केलं की भारतानं या देशांचा आवाज जागतिक व्यासपीठावर पोहोचवण्याची जबाबदारी घेतली आहे. जी-7 शिखर परिषदेत पंतप्रधानांचा हा सलग सहावा सहभाग होता. पंतप्रधान मोदी यांनी दहशतवादाविरुद्ध भारताच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला आणि पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केल्याबद्दल नेत्यांचे आभार मानले. त्यांनी दहशतवादाविरुद्ध जागतिक पातळीवर कारवाई करण्यास प्रोत्साहन देण्याचं आवाहन केलं आणि दहशतवादाला प्रोत्साहन आणि पाठिंबा देणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची गरज अधोरेखित केली. आपल्या दौऱ्याच्या पुढील टप्प्यात पंतप्रधान आता क्रोएशियाला रवाना झाले आहेत.

**11वर्षे**

गेल्या अकरा वर्षात केंद्र सरकारनं सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांनुसार काम करत देशात उल्लेखनीय परिवर्तन घडवून आणलं आहे. पायाभूत सेवा, शिक्षण, हरित ऊर्जा यासारख्या विविध क्षेत्रांबरोबरच आरोग्य क्षेत्रातही लक्षणीय परिवर्तन झालं आहे. आयुष्मान भारत योजनेचा लाभ जवळजवळ 55 कोटी लोकांना मिळत आहे. तर आयुष्मान वय वंदना योजनेअंतर्गत, 70 वर्षे आणि त्यावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य विम्याचा लाभ देण्यात येत आहे. आयुष्मान भारत डिजिटल मिशनच्या माध्यमातून आधुनिक पद्धतीनं आरोग्यसेवा पुरवली जात आहे, 78 कोटींहून अधिक आयुष्मान भारत आरोग्य खाती तयार करण्यात आली आहेत. आरोग्याशी संबंधित पायाभूत सुविधांची उभारणी झाल्यामुळे आरोग्य सेवेचा विस्तार झाला आहे. ईशान्येकडच्या राज्यांमध्ये एम्स रुग्णालयांची स्थापना करण्यात आली आहे. कोविडच्या जागतिक संकटातही भारताने टाळेबंदी, कृती दलाची स्थापना, लस निर्मिती अशा विविध पातळ्यांवर लक्षणीय काम केलं आहे.

**महाॲग्री-एआय**

महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण 2025 ते 2029 ला राज्य मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. यामुळे कृषि क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करून परिवर्तन घडवता येईल. कृत्रिम बुद्धीमत्ता, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धीमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ड्रोन, संगणकीय दृष्टीक्षमता, रोबोटिक्स, पूर्वानुमान विश्लेषण यांचा वापर करत, राज्यातले ॲग्रीस्टेक, महा-ॲग्रीस्टेक, महावेद, क्रॉपसॅप, ॲगमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डिबीटी यांसारखे प्रकल्प पुढं न्यायला मदत होणार आहे.

या बैठकीत इतरही महत्वाचे निर्णय मंत्रिमंडळानं घेतले. त्यानुसार केंद्र सरकारच्या WINDS, म्हणजे हवामान माहिती नेटवर्क डेटा यंत्रणा या प्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रं उभारली जाणार आहेत. यासाठी महावेध प्रकल्पाला मुदतवाढ द्यायचा निर्णय यावेळी झाला. आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुप्पटीनं वाढ करण्याचा तसंच ह्यात जोडीदारालाही मानधन देण्याचा निर्णयही या बैठकीत झाला.

राज्यातील विविध भागात मोसमी पावसाने हजेरी लावल्याने आतापर्यंत सुमारे साडे अकरा लाख हेक्टर शेतजमीनीवर पेरण्या झाल्या असल्याची माहिती राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली. राज्यातील सर्व धरणांच्या पाणीसाठ्यात चांगली वाढ होत असल्याचं देखील यावेळी सांगण्यात आलं.

**<u>योगदिन</u>**

अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन येत्या 21 जून रोजी देशासह जगभरात अनेक ठिकाणी साजरा होणार आहे. या निमित्तानं योग शिक्षिका आणि वजन नियंत्रण तज्ञ प्रियांका राऊत यांनी योगाभ्यासाचं महत्व सांगितलं आहे......

**योग म्हणजे नेमके काय? तर योग म्हणजे आपल्या शरीराला आपल्या मनाशी जोडणे म्हणजे योगा आहे. योगाचे आद्यगुरु श्री पतंजली ऋषी यांनी देखील योगाची व्याख्या करतांना योग चित्तवृत्ती निरोधः अशी केलेली आहे. म्हणजेच आपल्या मनाच्या चित्ताच्या ज्या वृत्ती आहेत त्यांचा निरोध करायचा आहे. याचाच अर्थ योग हा फक्त आपल्याला शारीरिक स्तरावरती फायदे देत नाही तर मानसिक बौद्धिक, भावनिक, आध्यात्मिक या सर्व स्तरावरती योग आपल्याला भरपूर फायदे देतो. योग हा परिपूर्ण आहे, सुखी आणि समृद्ध जीवनाचा राजमार्ग आहे. योग हा सर्वांसाठी आहे लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सगळ्या व्याधीग्रस्तांसाठी, विकारग्रस्तांसाठी त्यामुळे आपल्याला योग करत राहायचं आहे.आनंदी आणि दीर्घायुषी राहायचं असेल तर सदैव योग करत राहा.**

**<u>पालखी-महापूजा</u>**

यंदाच्या आषाढी एकादशीला 6 जुलै रोजी श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक करण्यात येईल. या महापूजेचं निमंत्रण देण्यासाठी मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज-औसेकर यांच्या शिष्टमंडळानं मुख्यमंत्री फडणवीस यांची काल वर्षा निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली.

दरम्यान संत श्री तुकाराम महाराज पालखी सोहळा आज दुपारी देहूतील मुख्य देऊळवाड्यातून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. या सोहळ्यासाठी सुमारे 500 दिंड्या देहूत दाखल झाल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ पालदखी प्रस्थान सोहळ्यासाठी उपस्थित राहणार असल्याची माहिती संत तुकाराम महाराज पालखी सोहळा प्रमुख दिलीप महाराज मोरे यांनी दिली.

त्र्यंबकेश्वर इथून निघालेली संत निवृत्ती नाथांची पालखी काल अहिल्यानगर जिल्ह्यात पोहोचली. यावेळी पालखीचं मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आलं. हिंगोली जिल्ह्यातील नरसी नामदेव इथून निघालेल्या संत नामदेव महाराजांच्या पालखी सोहळ्याचं पहिलं अश्व रिंगण काल हिंगोलीच्या रामलीला मैदानावर उत्साहात पार पडलं.

याबरोबरच एक आगळी वेगळी, दिव्यांग वारकऱ्यांची पाई दिंडी 1 जून ला वाशिम जिल्ह्यामधून निघाली असून ती आता परभणीत पोचली आहे. या दिंडीचे ठिकठिकाणी स्वागत होत आहे. यात काही दृष्टीबाधित महिलाही सहभागी झाल्या आहेत. ऐकुया या दिंडीतील एका वारकऱ्याचं मनोगत.....

**संत सूरदास हे विठ्ठलाचे नव्हे तर विष्णूचे भक्त होते, म्हणजे श्रीकृष्णाचे भक्त होते आणि त्यांनी श्रीकृष्णाला एकच दान मागत होतं की, तुझे रूप पाहण्यापुरते तरी मध्ये दृष्टी दे आणि श्रीकृष्णाने त्यांनी त्यांचं रूप दाखवण्यासाठी त्यांना दृष्टी प्रदान केली होती. जे अंध आहेत ते हे सर्व आमचे जे आहेत सुरांचे हे दास आहेत सर्वजण हे उच्चशिक्षित संगीतमध्ये एम ए झालेले नेट झालेले विशारद झालेले असे उच्चशिक्षित संगीतमधले तज्ज्ञ अभंग गात गात गाणे गात गात पांडुरंगाच्या चरणी लीन होण्यासाठी**

**गेल्या चौदा दिवसापासून वाशिमहून निघलेले आहेत. चारशे किलोमीटरचा हा आमचा प्रवास आहे जिथे जिथे आम्ही गावामध्ये जाणार आहोत तिथं अभंगाचे कार्यक्रम आणि गीतांचे रचनाही सादर करणार आहोत.**

**रेडीओ महोत्सव**

जागतिक संगीत दिनानिमित्त येत्या 21 जून रोजी देशातला पहिला सृजनशील आणि सांस्कृतिक रेडिओ महोत्सव तसंच महाराष्ट्र आशा रेडिओ गौरव पुरस्कार सोहळा मुंबईत होणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार यांनी काल वार्ताहर परिषदेत दिली. राज्याची सांस्कृतिक, ऐतिहासिक परंपरा जपण्याचं काम रेडिओनं केलं असून देशाच्या स्वातंत्र्यापासून ते महाराष्ट्राच्या निर्मितीपर्यंत सर्व ऐतिहासिक घटनांचा रेडिओ साक्षीदार आहे, असं शेलार यावेळी म्हणाले.

**पोलीस-बीड**

दरवर्षी पावसाळ्यात शेती, शेतीचा बांध, शेतीचा मालकी हक्क अशा कारणावरून शेतकऱ्यामध्ये वादविवाद सुरु होत असतात. वेळीच दखल न घेतल्यास अशा वादातून दखलपात्र गुन्हे घडतात. अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांचे संकल्पनेतून बीड जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत 'पोलीस आपल्या बांधावर' उपक्रम सुरु करण्यात आला आहे. अधिकारी आणि अंमलदार हे प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जावून आवश्यक ते कायदेशीर मार्गदर्शन आणि कारवाई करणार आहेत.

**नदी प्रदूषण- सोलापूर**

नदी, नाल्यांच्या आरोग्याकडे लक्ष देत आपला परिसर पाणीदार बनवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे, असं आवाहन जलतज्ञ डॉक्टर राजेंद्र सिंह यांनी काल सोलापूर मध्ये केलं. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे पीएम उषा योजनेअंतर्गत 'चला जाणूया नदीला' या विषयावर आयोजित एनएसएस कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या कार्यशाळेत डॉक्टर सिंह काल बोलत होते.

**पाऊस**

रत्नागिरी जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाचा जोर काल दुपारपासून कमी झाला. जिल्ह्यातल्या सर्व नद्यांची पाणीपातळी आता ओसरली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातही काल पावसाचा जोर कमी झाला; मात्र धरणातील पाण्याचा विसर्ग सुरू असल्यानं पंचगंगेची पाणी पातळी वाढलेलीच होती.

**हवामान**

आज कोकणात बहुतांश ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज असून किनारपट्टीलगतच्या भागांमध्ये सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.